**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक ०३ जानेवारी २०२५**

**ठळक बातम्या**

1. **थेट परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र अव्वल, सहा महिन्यात वार्षिक सरासरीच्या ९५ टक्के गुंतवणूक.**
2. **आदिवासी विकास विभागाच्या राज्यस्तरीय क्रीडा संमेलनाचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते नागपुरात उद्घाटन.**
3. **विविध अभिवादनपर कार्यक्रमांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी.**
4. **बॉर्डर-गावस्कर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या अखेरच्या सामन्यात भारताचा पहिला डाव १८५ धावांमधे आटोपला.**

## आता सविस्तर बातम्या .......

परकीय गुंतवणुक

परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्र सातत्याने अग्रेसर राहीला आहे. आताही २०२४-२५ या आर्थिक वर्षातील तिसऱ्या तिमाहीची आकडेवारी आली आहे. त्यात अवघ्या सहा महिन्यात १ लाख १३ हजार २३६ कोटी रुपये इतकी परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात झाली आहे. गेल्या चार वर्षातील वार्षिक गुंतवणुकीची सरासरी पाहता चालू आर्थिक वर्षातील सहा महिन्यातच महाराष्ट्राने एकूण ९४.७१ टक्के गुंतवणूक आकर्षित केल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक्स या समाज माध्यमात पोस्ट करत दिली. गेल्या चार वर्षातील सरासरी पाहिली तर दरवर्षी १ लाख १९ हजार ५५६ कोटी रुपये वार्षिक गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे. यंदा सहा महिन्यात १ लाख १३ हजार २३६ कोटी रुपये इतकी परकीय गुंतवणूक आली. याचाच अर्थ संपूर्ण वर्षभराच्या ९४.७१ टक्के गुंतवणूक ही फक्त सहा महिन्यात आली आहे. याबद्दल मी महाराष्ट्राचे मन:पूर्वक अभिनंदन करतो.माझे सहकारी उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि संपूर्ण मंत्रिमंडळाच्या नेतृत्वात आपल्या महाराष्ट्राची ही घौडदौड अशीच कायम राहील, महाराष्ट्र आता थांबणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली आहे.

मोदी विकास प्रकल्प

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दिल्लीत विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी करण्यात आली. जेजे क्लस्टर्समध्ये राहणाऱ्यांसाठी

नव्यानं बांधण्यात आलेल्या जवळपास सतराशे सदनिकांचं उद्घाटन त्यांच्या हस्ते झालं, तसंच राष्ट्रीय राजधानीच्या अशोक विहार भागातील पात्र लाभार्थींना या घरांच्या चाव्याही सुपूर्द केल्या. कार्यक्रमापूर्वी प्रधानमंत्र्यांनी झोपडीवासियांसाठी बांधलेल्या नव्या सदनिकांची पाहणी केली, तसंच स्थानिकांशी संवाद साधला. दिल्ली विद्यापीठाच्या जवळपास सहाशे कोटी रुपये खर्चाच्या तीन प्रकल्पांची पायाभरणी प्रधानमंत्री मोदी यांनी केली तसंच नज फगडच्या रोशनपुरा भागात वीर सावरकर महाविद्यालयाची कोनशिलाही त्यांच्या हस्ते बसविण्यात आली, तसंच केंद्रीय शिक्षण मंडळाच्या नवीन विस्तारित परिसराचं लोकार्पण त्यांनी केलं. केंद्रीय गृहनिर्माण आणि नगरविकास मंत्री मनोहर लाल यांचंही भाषण यावेळी झालं.

आदिवासी क्रीडा

आदिवासी विकास विभागाच्या तीन दिवसीय राज्यस्तरीय क्रीडा संमेलनाचं आज केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आलं हा सोहळा पोलिस मुख्यालय, पोलिस लाइन, टाकळी इथल्या मैदानावर पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके होते. आदिवासी विकास आयुक्त नयना गुंडे, आदिवासी विकास अप्पर आयुक्त रवींद्र ठाकरे यांसह स्थानिक लोकप्रतिनिधी देखील उपस्थित होते. याप्रसंगी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आयोजकांचे खेळाडूंचे तसेच प्रशिक्षण देणाऱ्यांचे कौतुक केले. शासकीय अनुदानित आश्रम शाळेचे विद्यार्थी राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत सहभागी होत असल्याचा आपल्याला आनंद असल्याची भावना गडकरी यांनी व्यक्त केली. खेळाच्या माध्यमातून स्वतःच व्यक्तिमत्व आपण घडवू शकतो, ते म्हणाले की....

***आपल्या सगळ्यांना इंग्लिश मधला शब्द माहिती आहे. स्पोर्ट्समन स्पिरिट आपलं व्यक्तित्व कर्तृत्व आणि नेतृत्व घडवायचं असेल तर आपण वेगवेगळ्या खेळांमध्ये खेळून आपला व्यक्तिमत्वचा निर्माण करू शकतो मला अतिशय आनंद आहे' या आपल्या गडचिरोली जिल्ह्यातल्या हेमलकसा भागातल्या आदिवासी मुलांनी ज्यामध्ये देखील उत्तम व्यक्ती, उत्तम नागरिक आणि उत्तम संशोधक, उत्तम शिक्षक, उत्तम खेळाडू हा लपलेला आहे आणि त्यांच्यामध्ये हि क्षमता आहे हे सिद्ध करून प्रात्यक्षिका दाखवली.***

राज्यातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमधील १,९१७ आदिवासी खेळाडू या स्पर्धेत सहभागी होणार आहे.आपली क्रीडा कौशल्ये दाखवतील. नागपूर, नाशिक, ठाणे आणि अमरावती या चार विभागांतील खेळाडू १४, १७ आणि १९ वयोगटांमध्ये कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, हँडबॉल, रिले यांसारख्या सांघिक खेळांबरोबरच लांबउडी, उंचउडी, गोळाफेक, भालाफेक, थाळीफेक आणि धावणे

यांसारख्या वैयक्तिक क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होणार आहेत. ही स्पर्धा ३ ते ५ जानेवारी या कालावधीत पार पडणार असून, खेळाडूंच्या नैपुण्याचे प्रदर्शन करण्यासाठी ही मोठी संधी आहे.

एम्स नागपूर

एम्स नागपूरला किडनी, कॉर्नियल, बोन मॅरो प्रत्यारोपण आणि हृदय प्रत्यारोपणाला मंजुरी मिळाल्यानंतर, संस्थेला आता यकृत प्रत्यारोपण करण्यासाठी मान्यता मिळाली आहे, मे 2023 मध्ये किडनी प्रत्यारोपण कार्यक्रम सुरू केल्यापासून संस्थेने प्रत्यारोपण कार्यक्रमात लक्षणीय प्रगती केली आहे आणि त्यानंतर 35 यशस्वी मूत्रपिंड प्रत्यारोपण केले आहेत. यामध्ये 10 जिवंत दात्यांकडून, 19 ब्रेनस्टेम-डेड (BSD) देणगी दारांकडून आणि 6 रक्ताभिसरणा नंतरच्या देणग्यांचा समावेश आहे.

राष्ट्रीय शेअर बाजार

२०२४ या वर्षात जगभरातला सर्वाधिक भांडवली निधी NSE अर्थात राष्ट्रीय शेअर बाजारातून उभारला गेला. आशियातल्या सर्वाधिक IPO- प्राथमिक समभाग विक्रींची नोंदही या शेअर बाजारात झाल्याचं NSE नं पत्रकात म्हटलं आहे. गेल्यावर्षी भारतीय बाजारातून कंपन्यांनी साडे १९ अब्ज डॉलरचा निधी गोळा केला. अमेरिकेच्या नॅसडॅक मधून साडे १६ अब्ज डॉलर आणि न्यूयॉर्क शेअर बाजारातून सुमारे १६ अब्ज डॉलरचा निधी या कालावधीत कंपन्यांनी गोळा केला. २०२४ या वर्षात राष्ट्रीय शेअर बाजारात एकूम २६८ IPO ची नोंद झाली. त्यात ९० मोठ्या कंपन्यांचे आणि १७८ लघू आणि मध्यम कंपन्यांचे होते. चीनच्या शांघाय शेअर बाजारात गेल्यावर्षी १०१ तर जपानच्या शेअर बाजारात ९३ IPO आले होते.

सावित्रीबाई फुले जयंती

स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतींना आज सर्वत्र अभिवादन करण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सावित्रीबाई फुले यांना अभिवादन केलं आहे. सावित्रीबाई महिला सक्षमीकरणाच्या जनक असून, शैक्षणिक आणि सामाजिक सुधारणा क्षेत्रातल्या अग्रणी आहेत. लोकांसाठी जीवनाचा दर्जा उत्तम ठेवण्यासाठी काम करताना सावित्रीबाईंचं कार्य सतत प्रेरणा देत असल्याचं, पंतप्रधानांनी सामाजिक माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनी राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी राजभवन इथं त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं.महिला लोकप्रतिनिधींच्या मागण्यांकडे गांभीर्याने

लक्ष देऊन निश्चित उपाययोजना करण्याचं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं आहे. सातारा जिल्ह्यात नायगाव इथं क्रांतिज्योती सावित्री बाई फुले यांच्या १९४व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात आज ते बोलत होते. नागपूर महानगर पालिका, महावितरणत आणि अनेक सामाजिक, शासकीय, खाजगी आस्थापनां-तर्फे त्यांना अभिवादन करण्यात आलं.

परीक्षा स्थगित

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची हिवाळी-2024 लेखी एम.ई. इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग (इलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड पॉवर) (सी.बी.सी.एस.) सत्र-1 आणि एम.ई. इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग (इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टीम) (सी.बी.सी.एस.) सत्र .-1 लेखी परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठाच्या **www.sgbau.ac.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहेत.

बॉर्डर गावस्कर

बॉर्डर गावस्कर चषक भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया क्रिकेट कसोटी मालिकेत सिडनी इथं सुरू असलेल्या अखेरच्या सामन्यात भारताचा पहिल्या डाव १८५ धावांवर आटोपला. भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. ऋषभ पंत ने सर्वाधिक ४० धावा केल्या तर रवींद्र जाडेजा ने २६ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाच्या बोलांड ने ३१ धावात ४ गडी बाद केले. ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव सुरु झाला असून दिवसअखेर १ बाद ९ धावा झाल्या आहेत.

हवामान

विदर्भात पुन्हा थंडीचा जोर वाढू लागला असून आज गोंदिया जिल्ह्यात आठ पूर्णांक आठ अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. गोंदिया नंतर नागपूर इथं नऊ अंश सेल्सिअस इतकं किमान तापमान नोंदवण्यात आलं. उर्वरित सर्व जिल्ह्यांमध्ये तापमान 11 अंश सेल्सिअस ते पंधरा अंश सेल्सिअस दरम्यान आहे. आज अकोला इथं 32.8 इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे. आगामी काही दिवस हवामान कोरड राहणार असल्याचा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागान व्यक्त केला आहे.

*****